# नगरसंस्थांचे तत्वज्ञान

## विभाग पहिला

प्रा. डी. एन्. सद्गुणे

### ● गरज ही मानवाची प्रेरणा–

नित्याच्या जीवनात मनुष्याला अनेक गरजा भासतात. कुणीही स्वयंपूर्ण नसतो, आणि गरजाही असंख्य तसेच अनंतही असतात. ह्या गरजांची पूर्ति करणे हेच सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे सारसर्वस्व ठरते. ह्या गरजांच्या पूर्तिसाठी जे जे म्हणून आवश्यक असेल ते ते प्राप्त करणे हे माणसाच्या दैनंदिन जीवनाचा फार मोठा भाग व्यापून उरते. पोटाचा प्रश्न, वस्त्रप्रावरण, निवारा, इत्यादि प्रश्नांनी त्याचे जीवन बव्हंशी व्यापलेले असते. कार्ल मार्क्सने तर मानवी मन हे भौतिक गरजातूनच बनत असल्याची ग्वाही आपणास दिल्याची आढळते.

### ● बिना सहकार नही उद्धार–

ह्या गरजापूर्तीसाठी तरी निदान मानवाला इतरांशी सहकार्य करणे भाग पडते. शेजारी, घरमालक, सावकार, किराणा व्यापारी, न्हावी, धोबी, आपणाला आवडो न आवडो, त्यांच्याशी संबंध हे ठेवावे लागतातच. खेरीज ह्या सर्वव्यापि संबंधातूनच मानवी मनाचा विकास होत असल्याने मनुष्य हा समाजप्रिय प्राणी बनला आहे. मनुष्याच्या ह्या गरजनिष्ठ व संगतप्रिय स्वभावातून

सामुदायिक जीवनाची वाढ होत गेली. हे सामुदायिक जीवन शांततामय व प्रगतपर राखण्यासाठी, माणसाने नियंत्रण संस्था शोधून काढली. नियंत्रणासाठी, आवश्यक ते कायदे करून, त्या द्वारा समाजाचे अधिकाधिक हित साधणे हे त्या नियंत्रण संस्थेचे – जिला आपण व्यवहारी भाषेत सरकार म्हणतो – तिचे प्रमुख कर्तव्य. समाजातील प्रत्येक घटक व्यक्तीला जास्तीत जास्त विकासाची संधी उपलब्ध करून देणे, हा शासनव्यवस्थेचा आदर्श. या आदर्शाची व कर्तव्यांची उत्कृष्ट सांगड रामाने घालून दिली म्हणून रामराज्याची पकड भारतीयांच्या मनावर फार.

## ● पाशवी शक्तीचे केंद्र–

समाजातील घटकांचे हितसंरक्षण व सुव्यवस्थेद्वारा स्वातंत्र्याची वाढ, ह्यासाठी निर्मिलेल्या सरकारच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होणे अपरिहार्यच आहे. संरक्षणासाठी, सैन्य, आरमार, हत्यारे व आयुधसंपत्ति, युद्धप्रसंगी करावे लागणारे मानवांचे नियंत्रण, युक्तायुक्त मार्गांनी उभारावा लागणारा द्रव्यसंचय, तसेच असामान्य असे धाडस, कर्तव्यशक्ति, महत्वाकांक्षा, इत्यादि गुणांनी संपन्न असलेले व्यक्तिमत्व, व त्यातून निर्माण झालेली विभूतिपूजा इत्यादि कारणांनी शासनयंत्रणा ही पाशवी शक्तीचे केंद्र बनत गेली. "सत्ता ही माणसाला भ्रष्ट करणारी आहे. अनिर्बंध सत्ता तर माणसाला निखालस भ्रष्ट करते" म्हणूनच उर्मट, उद्दाम, बेमुर्वतखोर सत्ताधाऱ्यांची परंपरा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासातील अनेक देशांच्या जीवनात आपणास आढळते. सत्तेचे केंद्रीकरण म्हणजे संधिशून्यता, असमानता आणि व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी.

## ● विकेंद्रीकरण हाच मार्ग–

सरकारच्या निरंकुश सत्तेत जास्तीत जास्त भागीदार असणे किंवा खऱ्या अर्थाने सर्वांचेच राज्य–जेथे सर्व शास्ते आणि शासीतही आहेत – अशी विकेंद्रित शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही. लोकशाही हा राज्यप्रकार लोकप्रिय का ठरतो ह्याचे प्रमुख कारण म्हणजे तेथे घडवून आणलेले सत्तेचे विकेंद्रीकरण होय.

"मनुष्य हा जन्मतः स्वतंत्र असून देखील सर्वत्र बंदिवासात असल्याचे भासते." ह्या जन्मजात स्वातंत्र्याचे रक्षण करणे ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे. त्यासाठी अनंत हाल अपेष्टा, कष्ट, रक्त आणि अश्रू सांडून मनुष्याने ही जीवनज्योत पेटती ठेवली आहे. मनुष्य लोकशाहीची कास धरतो. ह्याचे कारण लोकशाही ही व्यक्तीच्या प्रतिष्ठेची कदर करते, व्यक्तिस्वातंत्र्याची क्षितिजे रुंदावते. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" म्हणणारी ही शासनव्यवस्था, आजचा युगधर्म होऊ पहात आहे.

पण लोकशाही म्हणजे रोग छप्पन्न आणि मात्रा एक, असा गैरसमज होऊ नये. निसर्ग देखील, वाटेल तेथे वाटेल त्या काळी इच्छित वस्तू, वनस्पती अथवा वन्य जीव निर्माण करू शकत नाही. तद्वत लोकशाहीसाठी देखील काही विशिष्ट स्थळ, काल व मनोभूमि आवश्यक आहेत. विशेषतः यशस्वी लोकसत्ता स्थापन करतांना आपणाला लोकशाहीचा मूलभूत विचार करणे अत्यावश्यक ठरते.

## ● ग्रामराज्य ते रामराज्य–

लोकशाहीचा प्रवास ग्रामराज्यापासून सुरू होत असल्याने स्थानिक स्वराज्यसंस्थांना लोकशाहीचा पाळणा मानला जातो. स्थानिक स्वराज्यसंस्थांचे प्राथमिक तत्वज्ञान अगदी सुगमआहे. मानवी समुदायाच्या एखाद्या स्थानिक विभागाने आपले प्रश्न, आपल्या बुद्धीने, कुवतीनुसार सोडवावे हा त्यातील मुख्य गाभा. यासाठी आवश्यक सत्ता सर्वांच्या संमतीने धारण करावी व सर्वांच्या हितासाठी

वापरावी, हा त्यातील राजकीय अर्थ. त्या योगे एकमेकांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण होते. सहकार्याची भावना दृढावते व सर्वो-दयाचे क्षितिज दिसू शकते, हा झाला त्यातील सामाजिक भावार्थ. थोडक्या कष्टात, सह-कार्यामुळे थोडक्या मूल्यात, जीवनाच्या गरजा पुरविल्या जाण्याची शक्यता, हा त्यातील आर्थिक आशय. व्यक्तीच्या अंगी असलेल्या अनंत सुप्त शक्तींना प्रेरणा देऊन, संपन्न व्यक्तित्व घडविण्याची संधी प्राप्त होणे हा झाला, त्यातील लौकिक अर्थ.

" Local assemblies of citizens constitute thestrength of free nations. Town meetings are to liberty what primary sehools are to science. They bring liberty within the peoples' reach. They teach men, how to use and how to enjoy it. A nation may establish a system of free Government; but without the spirit of municipal institutions it cannot have the spirit of liberty." De Tocqueville

ज्ञानासाठी प्राथमिक शाळा, तशी स्वातंत्र्य जोपासनेसाठी ग्रामसंस्था अशी श्रद्धा असणाऱ्या वरील विचारवंताने स्वतंत्र राष्ट्राची शिवशक्ति स्थानिक स्वराज्य संस्थेत असल्याचा निर्वाळा दिला आहे.

● स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच लोकशाही–

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच व्यक्ति स्वातंत्र्याचा, लाभ होण्याची संधी असे समी-करण राज्यकर्त्यांनी ध्यानात घेणे आवश्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे स्थानिक नेतृत्व पैदा करुन, जोपासून, देशसेवेसाठी उपलब्ध करुन देण्याची शिक्षणपद्धति होय. अप्रत्यक्ष लोकशाही शासन व्यवस्थेचा, लोक-नेतृत्व हा गाभा. ज्या प्रमाणात आणि प्रतीचे लोकनेतृत्व असेल, त्या प्रमाणात व प्रतीची लोकसत्ता देशात पैदा होते हे आपल्या व शेजारच्या देशातील काही उदाहरणावरून ध्यानात येऊ शकेल. म्हणूनच लोकशाही यशस्वी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे तत्वज्ञान नीट आकलन होणे व तदनुसार आचरण घडणे ही आजची निकडीची गरज ठरते. ज्या देशात स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रतिष्ठा आहे, तेथेच लोकशाही बीजरूपाने नांदते आहे असा परामर्ष काढणे अयोग्य ठरणार नाही.

## लोकोपयोगी कारभार–

—आपण म्युनिसिपालिटीत १२–१३ वर्षे होतो. पहिली काही वर्षे आपापसा-तील भांडणात गेली.

—प्रेसिडेंटपदावर आलो असता महत्वाची २२ कामे पेंडिंग होती. ती तातडीने पूर्ण करण्यात आली.

—बाकी वसुली बरीच होती. सरकारकडून सूचना येताच बाकी वसुली न्याय-निष्ठुरपणे करण्यात आली. प्रेसिडेंट झाल्यावर बाकी वसुलीबाबत पहिली नोटीस आपण आपल्या वडिलांना काढली.

–भय्यासाहेब पांडे
माजी म्यु. प्रेसिडेंट